**आजचा सुविचार**

कोणतेही कार्य अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करतात, त्यांनाच यश प्राप्त होते...

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२९ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## मंत्रालयातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडल्याचा संदेश खोटा



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, मुंबई :** मंत्रालयातील पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडल्याच्या माहितीत तथ्य नाही. पाण्याच्या टाक्यांवर लोखंडी झाकणे बसवलेली आहेत. त्यामुळे टेरेसवर किंवा पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडू शकत नाही आणि पडलेले सुद्धा नाही. या टाक्यांची स्वच्छता शनिवार दिनांक २५ एप्रिल २०२६ व रविवार दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली आहेत. त्यामुळे अशा कोणत्याही पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडलेले किंवा मेलेले नाही. सदर व्हायरल झालेला संदेश हा खोटा आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई इलाख्यांच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी पत्राद्वारे कळविले आहे की, मागील चार-पाच दिवसांपासून विविध माध्यम तसेच समाजमाध्यमांवर तसेच मंत्रालयीन अधिकारी-कर्मचारी यांच्या व्हॉटसअॅप ग्रुपवर एक संदेश व्हायरल झाला असून ज्यामध्ये मंत्रालयाच्या टाकीमध्ये मांजर मरुन पडल्याचा खोटा संदेश फिरत असल्याचे निदर्शनास आले असून जो खोटा आहे.

गेल्या चार-पाच दिवसांपूर्वीच मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीच्या टेरेसवरील पाण्याच्या सिंटेक्सच्या टाक्या चेक केल्या असून, सदरच्या टाक्या ह्या १० फूट ते १२ फूट उंच असून सर्व टाक्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियमांनुसार साधारणता १० ते १५ किलो वजनाची लोखंडी झाकणे बसविलेली आहेत, जी पूर्ण वेळ बंद असतात. तसेच मंत्रालयाच्या टेरेसवरील प्रवेश दरवाजा सुद्धा कायम बंद असतो, काही दुरुस्तीची व अत्यावश्यक कामे करावयाची असल्यासच सदर दरवाजा उघडला जातो.

अशा परिस्थितीमध्ये टेरेसवर किंवा पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडूच शकत नाही आणि पडलेले सुद्धा नाही. तसेच मंत्रालयाच्या तळ जमिनीखालील पाण्याच्या टाक्या देखील शनिवार दिनांक २५ एप्रिल २०२६ व रविवार दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी साफ करण्याचे काम हाती घेण्यात आलेले होते व सर्व टाक्या चेक करुन साफ केलेल्या आहेत, त्यामुळे अशा कोणत्याही पाण्याच्या टाकीमध्ये मांजर पडलेले किंवा मेलेले नाही. सदर वायरल झालेला संदेश हा खोटा आहे, असे त्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## कुंडलवाडीत तापमान ४४ पार, नागरिक हैराण

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी :** येथे उष्णतेचा कडाका दिवसेंदिवस वाढत असून आज तापमानाने थेट ४४ अंश सेल्सियसचा टप्पा गाठला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांचे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडलेले दिसत आहेत. अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक घराबाहेर पडण्याचे टाळत असून, बाजारपेठांमध्येही ग्राहकांची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. शेतकरी व मजूर वर्गाला या उकाड्याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेशा प्रमाणात पाणी पिणे, हलके व सैल कपडे वापरणे आणि लहान मुले व वृद्धांची विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. उष्माघाताचा धोका वाढल्याने सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, अचानक वाढलेल्या तापमानामुळे वीज वापरातही मोठी वाढ झाली असून, काही भागात लोडशेडिंगची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एकूणच, कुंडलवाडीत उष्णतेचा पारा चढतच असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे बनले आहे.

## पुणे स्टेशनवर घसरलेला 'वंदे भारत'चा डबा अखेर हटवला, रेल्वेसेवा 'रुळावर

**दि.२८, पुणे :** मुंबईवरुन सोलापूरला निघालेली ' वंदे भारत एक्स्प्रेस ' (गाडी क्रमांक २२२२५) पुणे स्थानकाच्या फलाट क्रमांक तीनवर प्रवेश करताना सोमवारी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास घसरली होती. त्यामुळे एक्सप्रेस गाड्यांच्या वेळेवर मोठा परिणाम झाला. अखेर जवळपास सात तासांनी, मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास घसरलेली वंदे भारत यार्डात नेण्यात रेल्वे प्रशासनाला यश आलं आहे.

**रेल्वे रखडल्या, प्रवासी भडकले**

रेल्वे सेवा सुरळीत करण्यासाठी रेल्वे प्रशासनाचे रात्रभर युद्धपातळीवर काम सुरु आहे. वंदे भारतच्या अपघातामुळे पुण्याला येणाऱ्या-जाणाऱ्या आणि पुणेमार्गे वाहतूक करणाऱ्या रेल्वे सेवेवर मोठा परिणाम झाला. अनेक ट्रेन रखडल्यामुळे किंवा रद्द झाल्यामुळे प्रवासी पुणे रेल्वे स्थानकावरच अडकून पडले. वेळेवर उद्घोषणा होत नसल्याची खदखदही काही जणांनी व्यक्त केली. वाढत्या उकाड्यात रेल्वेच्या दिरंगाईमुळे अनेक प्रवाशांचा विचका झाला.

**पहिल्यांदाच वंदे भारत घसरली**

सोमवारी सायंकाळी साडेसात वाजता डायमंड क्रॉसिंगवर 'सी १५' या डब्याची पुढील चाके रुळावरून घसरली. त्यामुळे पुणे स्थानकावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. घसरलेला डबा रुळावर आणण्यास वेळ लागत असल्याने सोलापूरला जाणाऱ्या प्रवाशांना दुसऱ्या गाडीतून पाठवण्यात आले. वंदे भारत एक्स्प्रेस देशात सुरू झाल्यापासून प्रथमच ती रुळावरून घसरली.

**डबे घसरण्याचे कारण समोर :** मुंबईहून नेहमीच्या वेळेत सुटलेली वंदे भारत पुणे स्थानकावर वेळेत पोहोचली होती. ती फलाट क्रमांक तीनकडे जात असताना डायमंड क्रॉसिंगवर पुढील बाजूची चाके घसरली. डायमंड क्रॉसिंग म्हणजे दोन रेल्वे मार्ग एकमेकांना काटकोनात छेदतात ती विशेष रचना. पुणे स्थानकावर यार्ड रिमॉडलिंगच्या अंतर्गत येथील क्रॉसिंगच्या अपग्रेडचे काम सुरू होते. यामुळे डबे घरल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राज्यभरात तापमानाने टोक गाठलं, हवामान विभागाकडून मोठी अपडेट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, पुणे :** राज्यात तापमानात प्रचंड मोठी वाढ झाली आहे. विदर्भात सूर्य जणू काही आग ओकतोय की, काय अशी परिस्थिती आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमधील तापमान हे टोक गाठताना दिसत आहे. दररोज तापमानाचा नवा रेकॉर्ड तयार होताना दिसतोय. या तापमानामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मोठे हाल होताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या भीषण उष्णतेच्या लाटेत आतापर्यंत १० जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. अनेकांची प्रकृती बिघडली आहे. हवामानाचा हा पारा आजही जैसे थे बघायला मिळाला आहे. कडाक्याचं हे ऊन आणखी किती दिवस त्रास देणार? असा प्रश्न नागरिकांना सतावत आहे. पण आता पुढचे काही दिवस तापमानात काहीशी घट होणार असल्याची माहिती हवामान विभागाकडून मिळत आहे. पुणे हवामान विभागाचे ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून अनेक ठिकाणी तापमान ४२ ते ४३ डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त गेलेलं पोहोचलं आहे. अमरावतीत काल सर्वाधिक ४६.६ डिग्री तापमान होतं.. तर अकोला येथे ४६.३ आणि नागपूरमध्ये ४५ डिग्री तापमान होतं. विदर्भात सर्वाधिक तापमान नोंदवलं गेलं आहे. तसेच महाराष्ट्राच्या उर्वरित भागातही जास्त तापमान बघायला मिळालं आहे. तिथे तापमानाचा यलो अलर्ट कायम आहे, अशी प्रतिक्रिया हवामान शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिली.

मराठवाड्यातील परभणीला ४४.५, तर मध्य महाराष्ट्रात जळगाव येथे ४४.६ डिग्री तापमान तसेच अनेक ठिकाणी तापमान चाळिशी पार गेलेलं आहे. कोकण किनारपट्टीवरील जिल्हे आणि गोवा किनारपट्टी पाहिले तर बऱ्याच ठिकाणी ३५ ते ३६ डिग्री तापमान आहे. या ठिकाणी तापमान कमी असलं तरी उष्ण आणि दमट वातावरण आहे. त्यामुळे इथे उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे, अशी माहिती एस. डी. सानप यांनी दिली.

येणाऱ्या पाच दिवसांचा अंदाज बघितला तर आज विदर्भात उष्णतेची लाट कमी होण्याची शक्यता आहे. पण वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेष म्हणजे उद्यापासून विदर्भातील बऱ्याच ठिकाणी वादळी पावसाची शक्यता आहे. त्यामुळे तापमान दोन ते तीन अंशाने कमी होण्याची शक्यता आहे. असं असलं तरी तापमान ४० अंशाच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घ्यावी, असं आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे.

**नागरिकांना कशी काळजी घ्यावी?**

सातत्याने पाणी पित राहणं गरजेचं आहे. कारण घामामुळे शरीरातील पाणी बाहेर पडत असतं. त्यामुळे पाणी पिणं गरजेचं आहे. दुपारच्या वेळी घराबाहेर पडणं टाळलं पाहिजे. त्याचबरोबर उन्हात काम करणाऱ्या मजुरांनी दुपारच्या वेळी सावलीत बसणं गरजेचं आहे, अशी माहिती एस. डी. सानप यांनी दिली

**तापमानात काहीशी घट होणार**

पुण्यात कालच्या तुलनेत आज तापमानात काहीशी घट झालेली बघायला मिळत आहे. त्यामध्ये आणखी दोन ते तीन अंशानी घट होण्याची शक्यता आहे. हळूहळू येणाऱ्या दोन ते पाच दिवसात ते दिसून येईल. मराठवाडा आणि विदर्भातही दोन ते पाच अंशाने तापमानात घट होण्याची शक्यता आहे. पण तापमानाचा पारा एकदमच कमी होईल, असं म्हणता येणार नाही. तापमान ४० अंशाच्या पुढेच राहील. त्यामुळे काळजी घेणं गरजेचं आहे, असंही त्यांनी आवाहन केलं.

## पानसरेंवर मरणोत्तर फौजदारी कारवाई करा! आ.संजय गायकवाड




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, बुलढाणा :** 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे लेखक गोविंद पानसरे यांच्याविरुद्ध मरणोत्तर फौजदारी कारवाई करावी. स्वयंघोषित लेखक प्रशांत आंबी यांनी नियमांचे पालन न करता हे बनावट पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यांना तत्काळ अटक करावी, अशी नवी मागणी शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी सोमवारी केली. यासंदर्भात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

सदर पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख असल्याचा आरोप करून आमदार गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना अश्लील शिवीगाळ केली होती. जीवे मारण्याची धमकी दिली होती. या संवादाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर राज्यभर संताप उसळला. गायकवाड यांच्याविरुद्ध निदर्शनेही सुरू असतानाच त्यांनी दिवंगत पानसरे यांना पुन्हा लक्ष्य केले आहे. 'या पुस्तकात महाराष्ट्र आणि अखंड हिंदुस्थानाचे शासनकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा एकेरी उपयोग करून त्यांच्या नावावर कोट्यवधी रुपये कमविण्यात आले आहेत. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाद्वारे ही नुकसानभरपाई तत्काळ देण्याची मागणी करण्यात आली आहे.

पुस्तकाला आरएनआय क्रमांक आहे का, प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची मंजुरी आहे का आणि असल्यास ती सादर करावी. भारतीय प्रसार व प्रचार संचनालय या खात्याचे जिल्हाधिकाऱ्यांना असे पुस्तक छापण्याबाबत पत्र येते. ते पत्र हजर करावे. नसल्यास पुस्तकावर बंदी घालावी आणि लेखकाविरुद्ध फौजदारी कारवाई करावी. मुद्रकाकडे जिल्हाधिकाऱ्यांचे 'डिक्लेरेशन' आहे का आणि नसल्यास त्याला अटक करून त्याचे प्रेस मशिन जप्त करावे. डीटीपी ऑपरेटर तसेच वितरकांनाही अटक करावी. आजपर्यंत किती पुस्तक खपवले याबद्दल फौजदारी दाव्यात आणि दिवाणी दाव्यात उल्लेख करून विक्रीची संपत्ती राष्ट्रीय ही संपत्ती घोषित करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

**निदर्शकांना रोखले!**

कोल्हापूर : प्रकाशकाला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आमदार संजय गायकवाड यांच्यावर दखलपात्र गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी निदर्शने करणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याच्या दहनाचा प्रयत्न केला. पोलिसांनी हा पुतळा जप्त केला.

## बागी धीरेंद्र शास्त्रींवर गुन्हा दाखल होणार? शिवप्रेमींनी दिली बुलढाण्यात प्रथम तक्रार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, बुलढाणा :** छत्रपती शिवरायांचा अवमान करणाऱ्या बागी धीरेंद्र शास्त्रींवर गुन्हा दाखल करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रथम एफआयआर बुलढाण्यात दाखल करण्यात आली आहे.

शिवप्रेमींनी आज २८ एप्रिलला दुपारी एफआयआर नोंदवित तक्रार दाखल केली आहे. तसेच त्वरीत कारवाई करण्यासाठी आंदोलनात्मक इशारा देत धीरेंद्र शास्त्रींचे फोटो फाडून पायदळी तुडवीत निषेध सुद्धा व्यक्त केला आहे.



२४ एप्रिल ला नागपूर येथे भारतमातेची मूर्ती प्रतिष्ठापना मंदिराच्या शिलालेख कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्राचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये छत्रपती शिवरायांचा चुकीचा इतिहास सांगून भाकड कथा तयार केली. या भाकड कथेला कोणताही ऐतिहासिक पुरावा दस्त आधार नाही. त्यामुळे धीरेंद्र शास्त्रींनी जाणीवपूर्वक सुनीयोजीत कटकारस्थान रचून छत्रपती शिवरायांचा अवमान केला. तथाकथित रामदास स्वामी छत्रपती शिवरायांचे गुरु होते.

छत्रपती शिवराय त्यांच्याकडे गेले आणि त्यांना म्हटले की मी आता खूप थकलो. माझ्याकडून राज्यकारभार सांभाळला जात नाही. असे म्हणत स्वतःच्या डोक्यातील स्वराज्याचा अभिमान असलेला मुकुट काढून रामदास स्वामींना राज्यकारभार चालवण्याची विनंती केली. ज्यामुळे अखिल विश्वातील शिवप्रेमींच्या भावना पायदळी तुडवल्या. असंख्य शिवप्रेमींनी देशभर आंदोलन उभे केले. ज्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला.

त्यामुळे धीरेंद्र शास्त्री यांच्यावर सामाजिक तेढ निर्माण करणे, जातीय दंगल घडविणे, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे, छत्रपती शिवरायांचा अवमान करून सामाजिक अशांतता निर्माण करणे, कायद्याला न जुमानणे यासह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यासाठी आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. सतीशचंद्र रोठे पाटील यांनी रीतसर एफ आय नोंदवीत तक्रार देण्यात दिली आहे. बुलढाणा शहर पोलीस स्टेशन चौकशी अधिकाऱ्यांनी सदर तक्रार स्वीकारली आहे. तर तक्रारीनुसार त्वरीत गुन्हे दाखल करून कारवाई करावी.

अन्यथा आंदोलनात्मक पवित्रा घेण्याचा इशारा देत धीरेंद्र शास्त्रींचा फोटो फाडून पायदळी तुडवीत निषेधही यावेळी केला आहे.




## ट्रम्प यांच्यावरील संशयास्पद हल्ला



२५ एप्रिलच्या रात्री व्हाईट हाऊसचे वार्तांकन करणाऱ्या जगभरातील पत्रकारांसाठी हॉटेल हिल्टन येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कॅलिफोर्नियातील थॉमस ॲलन या ३१ वर्षीय तरुणाने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. सुदैवाने ते हल्ल्यात वाचले या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या हल्ल्यानंतर जगातील सर्वात सुरक्षित व्यक्ती म्हणून समजल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षा व्यवस्थेत असलेल्या त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत मी पुन्हा एकदा म्हणतोय कारण ट्रम्प यांच्यावर झालेला हा पहिला जीवघेणा हल्ला नाही यापूर्वी आठ वेळा ट्रम्प यांच्यावर असा जीवघेणा हल्ला झाला आहे.

अर्थात प्रत्येक वेळी ते हल्ल्यातून सुखरूप बचावतात त्यामुळे हे हल्ले डोनाल्ड ट्रम्प स्वतःच घडवून आणतात अशी चर्चा अमेरिकन प्रसारम ाध्यमात आहे. ज्या ज्या वेळी डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात जनमत तयार होते किंवा त्यांची लोकप्रियता कमी होते त्या त्या वेळी त्यांच्यावर असा जीवघेणा हल्ला होतो हा एक अजब योगायोग आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पहिला हल्ला ते निवडणुकीच्या प्रचार करताना झाला. ज्यावेळी त्यांच्यावर हल्ला झाला त्यावेळी निवडणूक सर्वे मध्ये ते पिछाडीवर पडले होते. त्यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्यांना प्रचंड सहानुभूती मिळाली व त्यानंतर त्यांनी निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकली. जिंकून आल्यावर त्यांनी अनेक निर्णय घेतले त्यातले बरेचसे निर्णय जनतेला पसंत पडले नाही.

त्यांच्या निर्णयाविरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली त्यांची लोकप्रियताही कमी झाली. ज्या वेळी त्यांची लोकप्रियता कमी झाली आणि त्यांच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरली नेमके त्याचवेळी त्यांच्यावर हल्ला झाला. आताही त्यांची लोकप्रियता कमालीची ढासळली आहे. त्यांनी इराणवर ज्या प्रकारे हल्ला केला तो अमेरिकेन जनतेला आवडलेला नाही. इराणवर हल्ला केल्या नंतर इराणने ज्या पद्धतीने प्रतिहल्ला केला त्यावरून अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली. ट्रम्प यांच्यामुळेच अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली असे म्हणत अमेरिकन जनता ट्रम्प यांच्या विरोधात रस्त्यावर उतरली. रस्त्यावर उतरून करोडो लोकांनी त्यांचा निषेध केला. सध्या डोनाल्ड ट्रम्प यांची लोकप्रियताही कमालीची ढासळली आहे आणि नेमक्या याच वेळेस हा हल्ला झाल्याने लोक या हल्ल्याविषयी शंका घेत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे जगातील सर्वात शक्तिशाली व्यक्ती आहे. त्यांची सुरक्षाव्यवस्था उच्चकोटीची असते. अशी उच्चकोटीची सुरक्षा यंत्रणा भेदून एक हल्लेखोर थेट हॉटेलमध्ये शिरतो आणि राष्ट्राध्यक्षांवर हल्ला करतो हे अजूनही काही लोकांच्या पचनी पडत नाही त्यामुळेच ते या हल्ल्यावर संशय घेत आहेत. अमेरिकेन राष्ट्राध्यक्षांनी सुरक्षा व्यवस्था इतकी तकलादू असू शकते यावर काही लोकांचा विश्वासच नाही त्यामुळे ते या हल्ल्याबाबत संशय व्यक्त करत आहेत अर्थात त्यांनी संशय घेण्यासारखीच परिस्थिती आहे हे देखील मान्य करावेच लागेल.

**– श्याम ठाणेदार**

# सवडीने नको तर आवडीने कार्य करण्याची गरज...

कर्म हीच व्यक्तीची खरी ओळख असते. चांगल्या कर्माला चांगल्या चारित्र्याची व चांगल्या स्वभावाची जोड मिळाली की निर्माण झालेली ओळख कायमस्वरूपी टिकून राहते. म्हणून आळस न करता आपले कर्तव्य समजून प्रत्येकाने चांगले कर्म करत राहावे.व्यक्तीच्या अंगी चांगले कर्म करण्याची धमक चांगले विचार आत्मसात केल्यामुळे आणि चांगल्या माणसांची संगत धरल्यामुळे निर्माण होते. आळशी माणसांची संगत धरल्यास कोणतेही काम सवडीने केले जाते आणि कर्तृत्ववान माणसांच्या संगतीत राहिल्यास आपले कर्तव्य ओळखून कोणतेही कार्य आवडीने केले जाते.

आपल्या अवतीभवती,आपल्या कार्य क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारचे लोक आपण नेहमी पाहतो.काही लोक इतके आळशी व काम चुकार असतात की सांगता सोय नाही.त्यांना कोणतेच काम करायला आवडत नाही.प्रत्येक काम करायला सवड बघितले जाते.जर आवडते काम असेल आणि ते काम कमी वेळात पूर्ण केल्यानंतर किती मोबदला मिळणार हे बघून काम करणारे खूप लोक भेटतात.

या प्रवृत्तीमुळे गुत्ता पद्धत अस्तित्वात आली आहे.रोजंदारीने काम करताना काही मजूर लोक दिवसभर टंगळमंगळ करताना दिसतात परंतु,त्याच कामाचे गुत्ते दिले की ते काम झटपट वेगाने व थातुरमातुर पद्धतीने केले जाते.

काही प्रामाणिक व कर्तव्यदक्ष नोकरदार त्यांच्या नोकरीत कधीच कामचुकारपणा करत नाहीत.असे नोकरदार ऑफिसमध्ये पूर्णवेळ काम करतात.आळस व कामचुकारपणा त्यांच्या मनाला कधी शिवत नाही. शिक्षकांचेही असेच आहे कर्तृत्ववान व आदर्श शिक्षक पूर्णवेळ वर्गात अध्यापन करतात.आपल्या शिक्षकी पेशाला योग्य न्याय देण्याचे कर्तव्य पार पाडतात. काही कामचुकार शिक्षक मात्र नेहमीच विद्यार्थ्यांना वर्ग पाठ देऊन टंगळमंगळ करताना दिसतात.आळशीपणा आणि कामचुकारपणा किमान शिक्षण क्षेत्रात तरी असू नये.शिक्षणक्षेत्र हे विद्यार्थी घडविण्याचे पवित्र क्षेत्र आहे याचे भान असावे.

अन्नधान्य पिकवणारे शेतकरी आणि देशाचे रक्षण करणारे सैनिक हे नेहमी आपापल्या कार्यासाठी तत्पर असतात. आळस आणि काम चुकारपणा त्यांच्या मनाला कधी शिवत नाही. ज्यांचे ध्येय हे उच्च दर्जाचे असते ते विद्यार्थी नेहमी शिक्षणात व अभ्यासात मग्न असतात. अनेक संकटे झेलून व तावून सुलाखून निघून हे विद्यार्थी त्यांचे उच्च ध्येय गाठल्याशिवाय शांत बसत नाहीत.असे विद्यार्थी घरच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवून सवडीने नाही तर आवडीने अभ्यास करतात.आळस व टाईमपास या शब्दांना ते जवळ फिरकू देत नाहीत.आपल्या नवीन पिढीचे दूर्दैव असे की ते शिक्षणाला आणि अभ्यासाला महत्त्व न देता मोबाईल आणि मनोरंजन यांना गरजेपेक्षा जास्त महत्त्व देत आहेत.आईवडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवणारे व आईवडिलांनी दिलेले संस्कार मनावर बिंबवणारे मुले मुली आळशीपणा व कामचुकारपणा कधीच करत नाहीत. माझ्या सुदैवाने माझ्या कष्टाळू आईवडिलांनी व आमच्या सर्व आदर्श शिक्षकांनी आमच्यावर चांगले संस्कार केले म्हणून आम्ही बालवयातच आळस व कामचुकारपणा शब्द झटकून टाकले आहेत.आणि आज शिक्षकाची नोकरी करताना कर्तव्यात कधीच कसूर करत नाही.

या लेखाचा समारोप करताना एवढे सांगावे वाटते की काम कोणतेही असो, नोकरी व व्यवसाय कोणताही असो ते आवडीने करा.या जगाला आवडीने कार्य करणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. सवडीने व चालढकल करीत काम करणाऱ्या आळशी लोकांमुळे या जगाचे फार नुकसान होत आहे.आळशी व काम चुकार लोकांकडे दुर्लक्ष करून इतरांनी आळस झटकून टाकावा व आपले कार्य इमानेइतबारे करत राहावे.

यावर्षीच्या पोलिस भरतीत अनेक होतकरू व कष्टाळू आईवडिलांच्या मुलांनी व मुलींनी घवघवीत यश संपादन केले आहे.अहमदपूर तालुक्यातील उमरगा कोर्ट येथील बाबासाहेब दगडू गुळवे व खंडाळी येथील अमन अविनाश हाडगेकर व दत्तात्रय नागोराव शेल्हाळे या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थिती असतानाही पोलिस भरतीत यश संपादन केले आहे व नोकरी मिळवली आहे.तसेच आसमा दस्तगीर शेख ही विद्यार्थीनी राज्य सेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन अधिकारी पदावर विराजमान झाली आहे.जर आवडीने अभ्यास केला व परिश्रम घेतले की यश हमखास मिळते हे त्यांनी दाखवून दिले आहे.यांचे व महाराष्ट्रातील इतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन!

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९५४५४४२६४८.**

# मानवी संवेदना जागृत करणारा छायाचित्रकार : रघु राय

देशातील छायाचित्र पत्रकारितेचे प्रणेते म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ भारतीय छायाचित्रकार रघु राय यांचे, गेल्या दोन वर्षांपासून कर्करोगाशी झुंज देत असताना, रविवार दि. २६ एप्रिल रोजी निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते.

१८ डिसेंबर १९४२ रोजी झांग (आताचे पाकिस्तान) येथे जन्मलेले राय हे केवळ भारतातच नव्हे, तर जगभरातील सर्वात आदरणीय छायाचित्रकारांपैकी एक होते. त्यांनी १९६० च्या दशकाच्या मध्यात आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. नंतर ते द स्टेट्समनमध्ये स्टाफ फोटोग्राफर म्हणून कार्यरत होते.१९७१ मध्ये पॅरिसमधील त्यांच्या कामाच्या प्रदर्शनाने प्रभावित होऊन, हेन्री कार्टियर-ब्रेसन यांनी १९७७ मध्ये राय यांना मॅग्नम फोटोजम ध्ये सामील होण्यासाठी नामांकित केले. त्यांनी इंडिया टुडे'च्या सुरुवातीच्या काळात चित्र संपादक/व्हिज्युलायझर/छायाचित्रकार म्हणूनही काम केले. रघु राय यांना भारतीय छायाचित्रण आणि छायाचित्र पत्रकारितेचे 'जनक' मानले जात असे. त्यांची कारकीर्द पाच दशकांहून अधिक काळ चालली, ज्यात त्यांनी



भारत आणि जगातील अनेक महत्त्वपूर्ण घटनांचे छायाचित्रण केले. १९७१ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते.

या दिग्गज छायाचित्रकाराने भोपाळम धील रासायनिक दुर्घटनेवरतील भीषणता एका अशा छायाचित्रात टिपली, जे आजही अंगावर काटा आणते. इतिहासातील सर्वात भीषण औद्योगिक दुर्घटनांपैकी एक असलेल्या भोपाळ वायू दुर्घटनेनंतर त्यांनी प्रभावी छायाचित्रे टिपली.

१९८४ च्या भोपाळ गॅस दुर्घटनेच्या वेळी त्यांनी काढलेल्या फोटोनी हे संपूर्ण संकट आणि शोकांतिका जगासमोर आणली होती. एक पिता आपल्या मुलाला दफन करतानाच्या एका फोटोचे उदाहरण आजही न्यूज फोटोग्राफीच्या जगात दिले जाते. त्या एका फोटोनं जगभरात औद्योगिक धोक्यांबाबत चर्चा सुरू केली होती. नंतरच्या वर्षांमध्येही रघु राय भोपाळला जात राहिले. या दुर्घटनेतील पीडितांच्या कुटुंबांची नोंद ते करत राहिले.

भोपाळ वायू दुर्घटनेने औद्योगिकीकरणाचे अक्राळ-विक्राळ रूप भारताला नव्हे तर जगाला दाखवून दिले. माणसाच्या गरजा वाढत गेल्या की त्याने त्या वाढवत नेल्या, हा एक अनुत्तरित प्रश्न आहे. औद्योगिकीकरण हे वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजांनुसार वाढत गेले. पण त्याचबरोबर जीवनशैलीतील बदल आणि त्याबरोबर औषधे, रसायने, रंग, कृत्रिम धागे, फॅशनेबल कपडे, पादत्राणे, विजेची उपकरणे, युद्धसामग्री, रासायनिक खते, कीटकनाशके, वाहने या वाढत्या गरजा त्याला किती प्रमाणात आवश्यक होत्या, याचे परीक्षण कधी झाले नाही.

माठातील पाणी उन्हाळ्यात पिण्याऐवजी फ्रिजमधील पाणी पिण्याची सवय स्वतःला लावून घेणे म्हणजे औद्योगिकीकरणाचा उपभोक्ता होणे होय. एसीचा वाढता वापर, मनोरंजनासाठी सतत टीव्ही पाहणे, मोबाईलचा अतिरेक वापर, गरजेपेक्षा जास्त कपडे, पादत्राणे, गॉगल्स यांचा संचयहे सर्व औद्योगिकीकरणाचे दुष्परिणामच म्हणावे लागतील. औद्योगिकीकरण ही आता न थांबवता येणारी प्रक्रिया बनली आहे.

रघु राय यांनी घेतलेले भोपाळ गॅस दुर्घटनेतील एका लहान मुलाच्या मृत्यूनंतरच्या अंत्यसंस्काराचे छायाचित्र आपल्याला शांतपणे विचार करण्यास भाग पाडते. आपण अंतर्मुख होतो.

कोणत्याही मातापित्याला आपल्या म ुलाच्या आजारपणाचा काळ हा संकटाहून कमी वाटत नसतो. आपल्या मुलाचा झालेला मृत्यू त्यांना जीवनपणी मृत्यूयातना देणारा असतो. स्वतःच्या पोटच्या गोळ्याला मातीआड लोटताना त्या मातापित्यांच्या भावनांना बांध कसा आणि कोठे घालता येणार? औद्योगिकीकरण आणि त्यात होणाऱ्या मानवी चुका यातून झालेली ही दुर्घटना निष्पाप मुलांच्या आणि तेथील नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरली होती.

आज संवेदना हरवत जात असताना समाजाला संवेदनशील बनवण्याचे काम फोटोग्राफर, पत्रकार, लेखक, सिने-नाट्य कलाकार, गायक, संगीतकार या सर्वांचे आहे. त्यांनी आपल्या व्यवसायाला न्याय देत समाजाला कठोर, अन्यायखोर, हिंसक, पाषाणहृदयी बनू न देण्याचा प्रयत्न आपल्या प्रत्येक कलाकृतीतून केला पाहिजे.

रघु राय यांच्या फोटोग्राफीतून त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल येणाऱ्या पिढ्या नक्कीच घेत राहतील. इंजिनिअरिंग आणि मेडिकल यांसारख्या घोटीव वाटा सोडून जीवनाचे ध्येय ठरवताना अनेक तरुण फोटोग्राफी, चित्रकला, गायन, वादन, लेखन, अभिनय यांसारख्या मानवी संवेदनांना फुंकर घालणाऱ्या क्षेत्रांची निवड करतील.

रघु राय यांनी कॅमेऱ्याने फक्त चित्रे टिपली नाहीत, तर काळाची वेदना जपली. म्हणूनच त्यांचे निधन झाले असले, तरी त्यांच्या छायाचित्रांतून माणुसकीची धडधड कायम जिवंत राहील.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**

## हालचाल

निवडणूक समयांस
चाललेली हालचाल
बुध्दी न् बळाचाडाव
कुणाचीकाय रे चाल

भेटतात मोठे नेतोबा
विचारायं हालहवाल
रात्रीअपरात्रीकधीही
विचारेआहां खुशाल

सवय माध्यमांना हो
केवळकरावा बवाल
किंतु परंतु काय हेतू
करतराहतात सवाल

घोडे दौडाया लागले
सापडताकुठेही नाल
काही घडेल अघटित
तोंडे वेंगाडी चवचाल

चॅनेल बाजार भरवले
विकू आपापला माल
चमचमीत का लागते
खरी लोकांची कमाल

नक्राश्रूचा वाहतो पूर
भिजून चिंबले रुमाल
नवीनसोयरिक जमवू
का गुलाबी झालेगाल

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# गेल्या ५ वर्षात जगात श्रीमंतांची संख्या तब्बल १. ६२ लाखावर वाढली

सध्या जगात दर २४ तासाला ८९ नवीन अति श्रीमंत तयार होत आहेत. ज्या लोकांच्या कडे तीन कोटी डॉलर्स म्हणजेच २८२ कोटी रुपये अधिक संपत्ती असणाऱ्यांना सुपर रिच असे म्हटले जाते. नाईट फ्रँक च्या रिपोर्ट नुसार ही संख्या २०२६ पर्यंत सात लाख तेरा हजार ६२६ वर पोहचली आहे. भारतात तर लखपती वाढत चाललेले चित्र समोर येत आहे.

भारतात सुपर रिच व्यक्तींची संख्या २०२१ मधील सुमारे १२ हजाराहून वाढून २०२६ मध्ये १९८७७ झाली आहे. गेल्या पाच वर्षात सुपर रिच मध्ये ६३ टक्के वाढ झाली आहे. २०३१ मध्ये ही संख्या वाढून २५२१७ पर्यंत पोहचेल. भारतात सध्या २०७ अब्जाधीश आहेत २०३१ मध्ये ही संख्या ५१ टक्क्यांनी वाढून ती ३१३ होणार आहे. ही बातमी नुकतीच वाचली. जगात इंडोनेशियामध्ये



श्रीमंतांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ८२ टक्क्यांनी वाढेल. अमेरिका सुद्धा काही कमी नाही. जगातील अति श्रीमंत मध्ये २०२१ मध्ये अमेरिकेचा वाटा ३३ टक्के होता . तो वाढून आता ३५ टक्के झाला आहे गेल्या चार वर्षात जेवढे नवीन श्रीमंत तयार झाले त्यापैकी एकट्या अमेरिकेचे ४१ टक्के आहेत जगात एकूण अब्जाधीश ३११० एवढे आहेत.

एकूणच मराठीत एक म्हण आहे कि पैश्या पाशी पैसा जातो हे अगदी खरे आहे. संपत्ती वाढली म्हणजे त्या सगळ्या संपत्तीचा ते उपभोग घेऊ शकत नाहीत. ती केवळ बँकेतील किन्वा गुंतवणुकीतील एक पुंजी असेल. माणसाला गरजेपुरती संपत्ती असली कि तो आनंदी असतो. कशाला हवी जादा संपत्ती ? जितकी जास्त संपत्ती तेवढे सुख मात्र कमी कमी होत जाते. गरजेपुरती संपत्ती असली कि माणूस सुखी.... बरे परमेश्वर कृपेने संपत्ती वाढली तर त्याचा उपयोग समाजासाठी करावा. जे समाजाकडून मिळविले ते समाजाला परत केले कि आनंद वाढतो आजकाल अनेक राजकारणी, क्रिकेटर मंडळी कोट्यधीश आहेत संपत्तीचा उपभोग काही अंशी घेणे सुद्धा महत्वाचे आहे. कारण माणूस काही संपत्ती घेऊन जात नाही एकूणच हल्ली कोट्याधीश वाढत आहेत त्यांनी समाजासाठी काही भाग खर्च करावा ही अपेक्षा आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मंडणगड भिंगळोली परिसरातील अतिक्रमणांकडे यंत्रणा लक्ष देणार का ?



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२८, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड शहर परिसर व भिंगळोली गावाचे हद्दीत मुख्य रस्त्यालगत व मोक्याची ठिकाणी अतिक्रमण करुन दुकान गाळे उभे करणाऱ्यांमध्ये स्थानीक लोकप्रतिनिधी शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे ही गाळे असल्याची धक्कादायक माहीती पुढे येत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे निर्मीतीमुळे मंडणगड व भिंगळोली या दोन गावांच्या विकासाची गती दुप्पटीने वाढली आहे. मंडणगड हे गाव तालुक्याचे ठिकाण असले तरी भिंगळोली गावाचे हद्दीत तहसिल, महसूल, पोलीस, कोर्ट, ग्रामिण रुग्णालय, महावितण पॉवर हाऊस ही महत्वाची शासकीय कार्यालये आहेत. येथे जागेला सोन्यापेक्षा जास्तीचा भाव सध्या आला आहे. दोन्ही गावाची नैसर्गीक संरचना लक्षात घेता बाजारपेठ विकसित करण्याच्या फारच कमी संधी येथे उपलब्ध असल्याने महामार्ग व उपरस्ते यांच्या शेजारी असलेली सार्वजनीक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात येणारी जागा अतिक्रमण करणाऱ्यासांठी आयते कुरण असल्याने अतिक्रमणकाऱ्यांनी सध्या रस्त्याशेजारी असलेल्या मोकळ्या जागीवर आपले लक्ष केंद्रीत केले आहे. मोकळी जागा विविध मार्गाने अडवीले जात आहे व रस्त्याचे काम पुर्ण झाल्यावर येथे पत्र्यांचे खोके उभे केले जातील भिंगळोली येथील तहसिल कार्यालय व महावितरण पॉवर हाऊसचे परिसराचे कंपाऊंड वॉल चे भिंतील लागून अशाच प्रकारची अतिक्रमणे गेल्या ५ महिन्यापासून मोठ्या संख्येने वाढली आहेत.

मंडणगड पाट रस्तावर ही नव्याने गाळे उभे राहत आहेत. याकडे भिंगळोली ग्राम पंचायत, मंडणगड नगरपंचायत व मंडणगड तहसील कार्यालयाने पुर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले आहे. मंडणगड नगरपंचायतीचे कार्यक्षेत्रात जागा विकसीत करताना बांधकामाच्या नियमांकडे डोळेझाक करुन केलेल्या बांधकामावर नगरपंचायतीने आक्षेप घेऊन नंतर ती लागलीच नियमीत केलेली आहेत. मात्र रस्त्याशेजारी होणाऱ्या बांधकामांकडे मंडणगड येथे ग्रामपंचायतीचे अस्तीत्व असलेल्या काळापासूनच दुर्लक्ष केल्याने महामार्गाचे निर्मीतीचे वेळी दुकानगाळ्याचे पुन्नर्रवसानाची समस्या निर्माण झालेली आहे अनधिकृत विनापरवाना बांधकामांमुळे एककीकडे शहराचे बकालीकरण व वाहतूक समस्या गंभीर समस्येचे स्वरुप धारण केलेले असताना या संदर्भातील कायद्यांची अंमलबजावणी करणारे सर्वच घटक झोपेचे सोंग घेतल्याचा आव आणीत असल्याने अतिक्रमण करणाऱ्यांना कायदा यंत्रणा पोलीस न्यायालय यांचे कोणाचेही भय राहीलेले नाही व संबंधीत यंत्रणांतील काही महत्वाचे घटकच शहराचे बकालीकरणात सक्रीय झाले आहेत. याकडे सर्व यंत्रणांचे वेळीच लक्ष देण्याची मागणी नागरीकांमधून होत आहे.

## मिलिंद विद्यालयाचे एन. एम. एम. एस. परीक्षेत घवघवीत यश



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी :** सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मिलिंद विद्यालयाने गेल्या बारा वर्षांपूर्वी सुरू केलेली परंपरा या वर्षी सुद्धा अखंडित ठेवून बिलोली तालुक्यात सर्वात जास्त शिष्यवृत्तीधारक देणारी शाळा म्हणून पात्र ठरली आहे. यावर्षी झालेल्या एन. एम. एम. एस. परीक्षेत या शाळेचे सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून यामध्ये प्रवीण जजगेकर, कु. अवनी अर्जुने, कु. ऋतुजा गंगुलवार, महेश कोटलावार,कु. नक्षत्रा मामडे,कु. अंजली राचोटी या सहा विद्यार्थ्यांचा समावेश आहे. नुकतेच विद्यालयाने या सहाही विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासोबत शाळेमध्ये एका विशेष कार्यक्रमात सत्कार घडवून आणलेला आहे. गेल्या बारा वर्षापासून अखंडितपणे या शाळेने विद्यार्थ्यांना दरवर्षी एन. एम. एम. एस. परीक्षेत बसून वर्षभर उत्कृष्ट अध्यापन, सूक्ष्म नियोजन व दर महिन्याला घटक चाचणी घेऊन व परीक्षेसमोर दररोज चाचण्या घेऊन विद्यार्थ्यांना परीक्षेत पात्र होण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक एच. एन. पांचाळ, परिक्षा प्रमुख बालाजी गंगोने यांच्यासह सर्व विषय शिक्षक परिश्रम घेतात. आतापर्यंत गेल्या बारा वर्षात या शाळेने ९९ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी बनवले असून त्यांना दरवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे चार वर्षात ४८,००० रुपये शिष्यवृत्ती नववी ते बारावीपर्यंत मिळते. यावर्षी सुद्धा या विद्यालयाचे सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून बिलोली तालुक्यात सर्वात जास्त शिष्यवृत्तीधारक देणारी शाळा ठरली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोहगावकर, संचालक विजयकुमार लोहगावकर, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक एच. एन. पांचाळ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आर.डी. नरावाड यांनी या परीक्षेचे परीक्षा प्रमुख बालाजी गंगोने व मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

## श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रस्तावित कामांना मंजुरी देणार – मुख्यमंत्री

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि,२८, बार्शी :** बार्शी शहरातील ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेल्या श्री भगवंत मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा प्रशासनाकडे सादर झाला असून, हा आराखडा राज्य शिखर समितीकडे आल्यानंतर त्यामधील प्रस्तावित कामे व निधीनुसार शासनामार्फत मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बार्शी येथील श्री भगवंत मंदिरात श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महापूजेला मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित राहून विधिवत पूजा व आरती केली. यावेळी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना तसेच रमाई आवास योजनेंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना घराच्या चावीचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, धाराशीव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत, सोलापूर जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले की, विष्णु पुराणातही या परिसराचा उल्लेख आढळून येतो. प्राचीन काळापासून चालत आलेल्या लोकपरंपरा, अध्यात्म, तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा जपणे ही काळाची गरज आहे. हा सांस्कृतिक ठेवा जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याला शासनाची मान्यता देण्यात येईल आणि श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून या भागाचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## 'मिशन भरारी' उपक्रमांतर्गत ५९ ग्रामीण विद्यार्थ्यांची 'इस्रो' सफर; उपमुख्यमंत्र्यांनी दाखविला हिरवा झेंडा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, ठाणे :** जवळपास ९ हजार ५०० विद्यार्थ्यांमधून निवड झालेल्या ५९ ग्रामीण विद्यार्थ्यांना थेट इस्रोसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेला भेट देण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'मिशन भरारी' या उपक्रमातून 'ग्रामीण ते अवकाश' हे व्हिजन प्रत्यक्षात उतरतानाचे चित्र पाहायला मिळत आहे. या शैक्षणिक सहलीला सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथून हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

'मिशन भरारी' उपक्रमाचे उद्घाटन २६ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते आठवीच्या अभ्यासक्रमावर आधारित स्पर्धा परीक्षांद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. पहिल्या टप्प्यात ९ हजार ३१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, त्यातून २००७ विद्यार्थ्यांची तालुकास्तरावर निवड झाली आणि अंतिम टप्प्यात ४७८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर परीक्षा घेण्यात आली.

या संपूर्ण प्रक्रियेतून प्रत्येक तालुक्यातील सरासरी १० विद्यार्थ्यांची निवड करून एकूण ५९ विद्यार्थ्यांना या विशेष सहलीसाठी पात्र ठरवण्यात आले असून, यामध्ये ५४ मराठी माध्यम आणि ५ उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.ही सहल केवळ पर्यटन नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आखलेला उपक्रम आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण करणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे शिंदे म्हणाले.




विद्यार्थ्यांना संशोधन, अवकाश विज्ञान, प्रयोगशाळा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे, याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले.सहल कार्यक्रमानुसार २८ एप्रिल रोजी विवेकानंद रॉक मेमोरियल, तिरुवल्लुवर पुतळा आणि सनसेट व्ह्यू पॉईंटला भेट दिली जाईल.

२९ एप्रिल रोजी विक्रम साराभाई स्पेस सेंटर, थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लाँचिंग स्टेशन आणि प्रियदर्शिनी तारांगण येथे भेट दिली जाईल. ३० एप्रिल रोजी नैसर्गिक इतिहास संग्रहालये, तर १ मे रोजी नेपियर संग्रहालय येथे भेट देऊन परतीचा प्रवास केला जाईल. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. राहण्याची व्यवस्था फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये करण्यात आली असून, प्रवासासाठी वातानुकूलित बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सहलीदरम्यान वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना ब्लेझर, टी-शर्ट, ट्रॅक पॅन्ट, कॅप, स्पोर्ट्स शूज, सॉक्स, ओळखपत्र आणि ट्रॉली बॅग आदी साहित्य देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, विद्यार्थ्यांना कोणतीही सुविधा कमी पडू नये, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या असल्याचे शिंदे म्हणाले. जवळपास ९५०० विद्यार्थ्यांमधून ५९ विद्यार्थ्यांची निवड होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. जिल्हा परिषद शाळांमधील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इस्रोसारख्या संस्थेत जाण्याची संधी मिळत आहे.ते पुढे म्हणाले, एपीजे अब्दुल कलाम, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांनी नेहमीच ग्रामीण भागातील शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर दिला. त्या विचारांनुसार हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

हे ५९ विद्यार्थी सहलीवरून परतल्यानंतर त्यांनी घेतलेले अनुभव जिल्हा परिषद शाळांमधील इतर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. त्यामुळे विज्ञानाविषयी कुतूहल आणि प्रेरणा निर्माण होणार असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवी दिशा मिळणार आहे.

या मुलांना इस्रो येथे पाठवण्यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी आमदार किसन कथोरे, आमदार निरंजन डावखरे, आमदार राजेश मोरे, आमदार शांताराम मोरे, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, उपजिल्हाधिकारी संदीप माने आणि जिल्हा प्रशासनातील सर्व प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## 'मन की बात' केवळ संवाद कार्यक्रम नाही, विकासाचा राजमार्ग; आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** देशगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'मन की बात' या संवाद कार्यक्रमातून देशातील नाविन्यपूर्ण, प्रेरणादायी आणि जनहिताच्या कामांना नवी दिशा मिळते. त्या विचारांना स्थानिक पातळीवर कृतीत उतरवणे हीच खरी जनसेवा असून 'मन की बात' हा केवळ संवादाचा कार्यक्रम नसून देशाच्या विकासाचा राजमार्ग आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. विसापूर, ता.बल्लारपूर येथील पंढरीनाथ देवस्थान मंगल कार्यालयात आयोजित 'मन की बात' कार्यक्रमात ते बोलत होते.

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात शिक्षण, महिला सक्षमीकरण, शेती, रोजगार, पर्यावरण आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून 'मन की बात'मधील संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे ही आ. मुनगंटीवार यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी विसापूर येथील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मन की बात हे स्मृतिचिन्ह भेट देत आ. सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला पिंटू देऊळकर, किशोर पदींलवार, गणेश टोंगे, संदीप पोडे, गजानन पाटणकर, विलास भोयर, किशोर चोपडे, संजय सिडाम, भारत जीवने, वैभव भोले, विजय इटणकर, विद्याताई देवाळकर, सुरेखाताई ईटणकर, अंजलीताई पंदिलवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. मुनगंटीवार म्हणाले की, देशगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे जगातील असे एकमेव प्रधानमंत्री आहेत जे जनतेशी थेट संवाद साधतात. 'मन की बात'च्या माध्यमातून देशातील वैशिष्ट्यपूर्ण, नाविन्यपूर्ण आणि प्रेरणादायी कार्यांवर प्रकाश टाकला जातो. भारताच्या अभिमान, स्वाभिमान आणि प्रगतीची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून समाजात सकारात्मक प्रेरणा निर्माण करण्याचे काम 'मन की बात' या संवाद कार्यक्रमातून मिळते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी बल्लारपूर येथे एसएनडीटी विद्यापीठाचे उपकेंद्र, स्वर्गीय सुषमा स्वराज कौशल्य विकास केंद्र, स्मार्ट आयटीआय, मुल येथील पॉलीटेक्निक कॉलेज, कृषी महाविद्यालय, अजयपूर येथील शेतकरी प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र तसेच अत्याधुनिक सैनिक शाळा अशा अनेक विकासकाम द्वारे 'मन की बात'मधील विचारांना मूर्त स्वरूप देण्यात



आले आहे, असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. विसापूरच्या विकासाबाबत बोलताना आ.मुनगंटीवार यांनी सांगितले, १९९५ च्या विसापूर आणि आजच्या विसापूरमध्ये मोठा बदल झाला आहे. रेल्वे प्लॅटफॉर्म, अंतर्गत सिमेंट रस्ते, पिण्याच्या पाण्याची योजना, विविध समाजांसाठी सामाजिक सभागृह तसेच महिला बचत गटांच्या प्रभाग संघासाठी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

***सेवाभावाचा सुंदर उपक्रम : ज्येष्ठांना काठीचे वितरण***

विसापूर येथील ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानार्थ तसेच त्यांच्या दैनंदिन जीवनात आधार मिळावा या उद्देशाने आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून काठी वितरणाचा सुंदर उपक्रम आयोजित करण्यात आला. समाजातील ज्येष्ठांचा सन्मान राखणे, त्यांच्या गरजांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि त्यांच्या आयुष्यात आधार निर्माण करणे हीच खरी जनसेवा असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

## १४ गावांना १५ मे पर्यंत मूलभूत सुविधा द्या; महापौर यांचे प्रशासनाला आदेश

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दहिसर (ठाणे) :** नवी मुंबई महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या १४ गावांतील नागरिकांना प्राधान्याने मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश महापौर श्रीम. सुजाता पाटील यांनी महापालिका प्रशासनाला दिले. दिनांक १५ मे २०२६ पर्यंत या गावांमध्ये जन्म-मृत्यू नोंदणी, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता व रस्ते या सुविधा सुरू करा, असे त्यांनी बजावले.

महापौरांच्या अध्यक्षतेखाली बेलापूर मुख्यालयात १४ गावांच्या प्रश्नांबाबत विशेष बैठक झाली. यावेळी आयुक्त डॉ.कैलास शिंदे, सभागृह नेते सागर नाईक, एच प्रभाग सभापती भरत भोईर, नगरसेवक शशिकांत भोईर, सुरज पाटील, प्रतिक्षा पाटील, सर्व विभागप्रमुख व १४ गावांतील नागरिक प्रतिनिधी उपस्थित होते.

दि.०७ मार्च २०२४ रोजी १४ महसुली गावांचा नवी मुंबई मनपा क्षेत्रात समावेश करण्याचा शासन निर्णय जारी झाला. त्यानुसार मनपाने



परिमंडळ ३ स्थापन करून अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. सध्या ५ ग्रामपंचायतींचे दप्तर व मालमत्ता हस्तांतरणाचे काम सुरू असून ते वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या.

*** ग्रामस्थांनी मांडल्या समस्या**

एच प्रभाग सभापती भरत भोईर व इतर नगरसेवक, ग्रामस्थांनी रस्ते, पाणी, गटारे, कचरा, आरोग्य केंद्र, शाळा यांचा अभाव असल्याचे सांगितले.

***महापौरांचे ४ प्रमुख निर्देश**

१. जन्म-मृत्यू नोंदणी : पहिल्या टप्प्यात १५ मे पूर्वी तातडीने सुरू करावी.

२. आरोग्य व शिक्षण : प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी व शाळा तातडीने कार्यान्वित कराव्यात.

३. दैनंदिन स्वच्छता : कचरा उचलणे, सफाई व फवारणी नियमित सुरू करावी.

४. रस्ते व दिवाबत्ती : मुख्य रस्त्यांची डागडुजी व पथदिवे बसवण्याचे काम प्राधान्याने करावे.

१४ गावांतील नागरिक आता मनपाचे हक्काचे नागरिक आहेत. त्यांना शहरासारख्याच सुविधा मिळाल्या पाहिजेत. १५ मे पर्यंत काम सुरू झालेच पाहिजे, असा सज्जड इशारा महापौर सुजाता पाटील यांनी दिला. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी २० मे रोजी आढावा बैठक घेऊन सर्व विभागांकडून कामाचा अहवाल मागवला आहे.

# खरीप हंगामपूर्व तयारीसाठी मदनापूर येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२७, चिमूर :** खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम नियोजन पूर्वतयारी प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी मदनापूर येथे आयोजित करण्यात आला. तालुका कृषी अधिकारी शिवकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून खरीप हंगामात अधिक उत्पादन कसे मिळवता येईल, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रशिक्षणात खरीप हंगामासाठी आवश्यक असलेल्या जमिनीची पूर्वतयारी, खोल नांगरणी, कुळवणीचे महत्त्व, मृदा परीक्षण तसेच मृदास्वास्थ्य पत्रिकेचा वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच सुधारित वाणांची निवड, बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक आणि सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता चाचणी प्रत्यक्ष करून दाखविण्यात आली. फंगीसाइड व जैविक प्रक्रियेचा वापर करून बियाणे प्रक्रिया करण्याचे महत्त्वही शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमात सेंद्रिय व रासायनिक खतांचा संतुलित वापर, हवामानानुसार योग्य पिकांची निवड आणि पेरणी पद्धतीबाबत विशेष माहिती देण्यात आली. सोयाबीन पिकासाठी बीबीएफ अष्टसूत्री पद्धत, कापूस पिकासाठी रुंद सरी-वरंबा पद्धत तसेच भात पिकासाठी श्री पद्धतीने लागवड करण्याचे फायदे उपस्थित शेतकऱ्यांना पटवून सांगण्यात आले. याशिवाय पिकांमध्ये योग्य वेळ,



अंतर राखून पेरणी करणे तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमात मंडळ कृषी अधिकारी आर. बी. सोनवणे, सहाय्यक कृषी अधिकारी पी. पी. पवळ आणि सहाय्यक कृषी अधिकारी बी. बी. येवले यांनी शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला गावातील मोठ्या संख्येने शेतकरी तसेच महिला शेतकरी उपस्थित होत्या.

कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना योग्य दिशा मिळाल्याची भावना उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# निविष्ठा विक्रेत्यांचा एल्गार! निफाड तालुक्यातील कृषी दुकाने 'बेमुदत' बंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२७, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स अँड सीड्स डिलर्स असोसिएशनच्या राज्यव्यापी आवाहनाला प्रतिसाद देत निफाड तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सोमवार (दि. २७ एप्रिल) पासून बेमुदत बंद पुकारला आहे. प्रशासनाचा वाढता ताण आणि कंपन्यांच्या मनमानी कारभाराविरोधात पुकारलेल्या या आंदोलनामुळे तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांचे व्यवहार ठप्प झाले आहेत.

**या मागण्यांसाठी पुकारला बंद :**

तालुका अॅग्रो डिलर्स असोसिएशनच्या वतीने तहसीलदार विशाल नाईकवाडे, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार आणि पंचायत समितीचे कृषी अधिकारी मगल यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने खालील मुद्द्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे:

**लिंकिंग पद्धत थांबवा :** कंपन्यांकडून खतांसोबत नको असलेली उत्पादने गळ्यात मारण्याची (लिंकिंग) पद्धत बंद करावी.



शासनाने आमच्या न्याय्य मागण्यांचा विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा, हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामांना प्रशासन जबाबदार असेल.

**– बाळासाहेब जाधव**
**(अध्यक्ष, निफाड तालुका अॅग्रो डिलर्स असोसिएशन)**

**प्रशासकीय जाच कमी करा :** किरकोळ कारणावरून विक्रेत्यांवर केली जाणारी कडक कारवाई आणि प्रशासकीय दबाव थांबवावा.

**अनधिकृत विक्रीवर बंदी :** अनधिकृत एजंटमार्फत होणारी विक्री आणि अवैध 'बीटी' बियाण्यांच्या विक्रीवर कठोर नियंत्रण आणावे.

**विक्रेत्यांना जबाबदार धरणे थांबवा :** बियाणे किंवा औषधे निकृष्ट निघाल्यास केवळ दुकानदारांना दोषी न धरता मूळ कंपन्यांवर कारवाई व्हावी.

**उपस्थित पदाधिकारी :**

निवेदन देताना असोसिएशनचे उपाध्यक्ष रामभाऊ माळोदे, सरचिटणीस जयवंत कापसे, सहसरचिटणीस प्रल्हाद खडांगळे, खजिनदार ईश्वर जाधव यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य आणि तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ठळक मुद्दे :**

**कधीपासून बंद :** सोमवार, २७ एप्रिल २०२६.

**कुठे :** संपूर्ण निफाड तालुका.

**परिणाम :** खरीप हंगामाच्या तोंडावर दुकानं बंद झाल्याने खते आणि बियाणे खरेदीसाठी आलेल्या शेतकऱ्यांची गैरसोय होण्याची शक्यता.

# बल्लारपुरात बुद्ध जयंती निमित्त 'धम्मचक्र' महानाट्य प्रयोग

## ६० नाट्य कलावंतांचा खुल्या रंगमंचावर कलाविष्कार : पेपर मिल बुद्ध पोर्णिमा समारोह तर्फे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८,विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर येथील जागतिक स्तरावरील पेपर मिल उद्योग समुहातील कार्यरत बुद्ध पोर्णिमा समारोह समितीच्या वतीने तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध जयंती निमित्त पेपर मिल, कलामंदिर येथे खुल्या रंगमंचावर शुक्रवार (दि.१) मे रोजी सायंकाळी ७ वाजता 'धम्मचक्र' या महानाट्य प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. निशुल्क असलेल्या 'धम्मचक्र' महानाट्य प्रयोगात तब्बल ६० कलावंतांचा सहभाग राहणार असून तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध काळापासून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन संघर्ष प्रेक्षकांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून स्टिल अथोरीटी आफ इंडियाचे महाव्यवस्थापक राजेश गायकवाड चंद्रपूर, बिजीपिपीएलचे महाव्यवस्थापक उदय कुकडे बल्लारपूर, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) प्रविण शंकर, पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांची उपस्थिती राहणार आहे.

'धम्मचक्र' महानाट्य प्रयोगासाठी कलामंदिर येथे ५६ ÷ ३६ फुट व ८ फुट उंच भव्य रंगमंच उभारला जाणार असून लेजर विद्युतच्या झगमटातात व कर्णमधुर



ध्वनिक्षेपक या महानाट्याचा पहिल्यांदा पूर्व विदर्भात होत असल्याने प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे.

हिंदी भाषेतील 'धम्मचक्र' महानाट्य प्रयोगाचे सादरीकरण नागपूर येथील कृती थिएटर अंड स्पोर्ट अकादमी ६० नाट्य कलावंतांच्या माध्यमातून प्रत्यक्ष रंगमंचावर कलाविष्कार करणार आहे.

सदर महानाट्याच्या यशस्वी आयोजनासाठी बुद्ध पोर्णिमा जयंती समारोह समितीचे अतुल शेंडे, आकाशकांत दुर्गे, महेंद्र रामटेके, निलकंठ पाटील, विकास जयकर, मंगलदीप हस्ते, प्रितम उमरे, राजकुमार सोनारकर, राजेश गावंडे, सुमेध शेंडे, विकास पेटकर आदी पदाधिकारी परिश्रम घेत आहे.

# अमराठी चालकांना मराठीचे धडेही देणार : परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, मुंबई :** राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी परिवहन विभागाने १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान विशेष पडताळणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेचे नेतृत्व अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या ४ सदस्यीय समितीकडे सोपविण्यात आले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर तसेच अतिरिक्त परिवहन आयुक्त रवींद्र गायकवाड उपस्थित होते. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, रिक्षा-टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत सर्व संघटनांनी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद देत पूर्ण पाठिंबा दर्शविला आहे. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल, तर मराठी भाषा येणे आवश्यक आहे, ही भूमिका सर्वांनी मान्य केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील सर्व ५९ आरटीओंना १ मे पासून विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, या अंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या



तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई केली जाणार आहे. मात्र, केवळ मराठी भाषा येत नाही या कारणावरून परवाना रद्द केला जाणार नसून, इतर कायदेशीर तरतुदींनुसारच कारवाई केली जाईल.

मीरा-भाईंदर येथे राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेचा संदर्भ देत मंत्री सरनाईक म्हणाले की, एकूण ३,४४३ रिक्षांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी ५६५ चालकांना मराठी भाषेचे ज्ञान सिद्ध करता आले नाही. तथापि, या चालकांनी मराठी भाषा शिकण्याची तयारी दर्शविली आहे.

अतिरिक्त परिवहन आयुक्त गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समिती दररोज तसेच साप्ताहिक पातळीवर या मोहिमेचा आढावा घेणार असून, तपासणी अहवालांच्या आधारे पुढील कारवाई संदर्भात आरटीओंना निर्देश देणार आहे. या समितीच्या माध्यमातून संपूर्ण मोहिमेचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी सुनिश्चित केली जाणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

मराठी शिकण्यासाठी इच्छुक चालकांसाठी आरटीओ कार्यालयांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, 'कोकण मराठी साहित्य परिषद' आणि 'मुंबई मराठी साहित्य संघ' यांच्या सहकार्याने प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच मराठी शिकण्यासाठी पुस्तिका व ई-पुस्तिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मराठी भाषा शिकलेल्या चालकांना राज्य शासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार असून, परवाना नूतनीकरण करताना हे प्रमाणपत्र आवश्यक राहील, अशी माहितीही त्यांनी दिली.

मराठी शिकण्याची तयारी दर्शविणाऱ्या चालकांना संधी देणे ही राज्याची परंपरा आहे; मात्र नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशाराही मंत्री सरनाईक यांनी दिला.

या १०० दिवसांच्या मोहिमेनंतर १६ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वंकष अहवाल सादर करण्यात येणार असून, त्यानुसार पुढील धोरणात्मक निर्णय घेतले जातील, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी शेवटी स्पष्ट केले.

## थोडक्यात

# गरुडझेप यशाची!

## NMMS मध्ये ऐरोली माध्यमिक विद्यालयाचा दणदणीत पराक्रम

### २५ विद्यार्थ्यांनी पटकावली १२ लाख रुपये शिष्यवृत्ती'

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२७, ऐरोली (नवी मुंबई) :** ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था संचालित ऐरोली माध्यमिक विद्यालयाने NMMS (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख पुन्हा अधोरेखित केली आहे. विद्यालयातील २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून, ही कामगिरी संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची ठरली आहे. बुद्धिमत्ता व तर्कशक्तीचीकसोटी पाहणाऱ्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले. या यशामागे शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, संस्थेचे अध्यक्ष सुरेश संकपाळ यांचा पाठिंबा, तसेच उपाध्यक्षा गौरी मोकाशी, सचिव तुकाराम नांदुगडे, खजिनदार प्रशांत संकपाळ, संचालक दादासाहेब यादव, सौरभ संकपाळ, संचिलिका वैशाली संकपाळ यांचे सहकार्य तसेच मुख्याध्यापक शंकर देसाई व पर्यवेक्षक साहेबराव साळुंखे, संजय जाधव माजी मुख्याध्यापक सावंत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत ८ वी स्कॉलरशिप टिम चे प्रमुख युवराज सोळसकर, सचिन शिरसाट, जयश्री शेंदड, विकास घिगे, नितीन भुयार, मनीषा धायबर या सर्वांचे प्रभावी योगदान आहे.विद्यार्थ्यांच्या या यशात पालकांचे ही मोलाचे सहकार्य लाभले. शिष्यवृत्ती अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे पुढील ४ वर्षे आर्थिक सहाय्य मिळणार असून, एकूण सुमारे १२ लाखांची मदत विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी उपयुक्त ठरणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवे बळ मिळणार आहे.

गेल्या ४५ वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे ऐरोली माध्यमिक विद्यालय एस.एस.सी. परीक्षेत सातत्याने १०० टक्के निकाल देत आहे. NMMS मधील हे यश म्हणजे त्या गुणवत्तेची ठोस पावतीच आहे.या यशामुळे विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, विद्यालयाच्या या कामगिरीमुळे परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

# चौफेर मराठी वेबसीरीज होणार ३ मे ला प्रदर्शित




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, रत्नागिरी :** गणेश माळी लिखित दिग्दर्शित,बहुचर्चित मराठी वेबसिरीज चौफेरचाहूल पहिल्या प्रेमाची प्रदर्शनाची प्रतिक्षा आता संपलेली असून, या वेबसिरिजच्या पहिल्या सिजनचा पहिला भाग, रविवार ३ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता, नटखट प्रोडक्शन्स ऑफिशियल या यू ट्यूब वर प्रदर्शित होणार असल्याची माहिती ,या वेब सिरीजचे निर्माते सचिन वालम यांनी दिली. त्यामुळे खूप दिवसांपासून आतुरतेने वाट पाहणाऱ्या प्रेक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण पहायला मिळत आहे, नुकताच या वेब सिरीजचा टीझर अनावरण, शीर्षक गीत अनावरण, आणि पोस्टर अनावरण सोहळा मुंबई येथे जल्लोषात पार पडला होता. त्यामुळे प्रेक्षकही आता या सिरीजच्या स्वागताला सज्ज झाले आहेत.

या सिरीजची कथा/पटकथा/संवाद गणेश माळी यांनी लिहिली असून संकलन/मार्केटिंग/ कलर - अभिषेक पाडेकर, छायांकण- प्रितेश घडवले, वीएफेक्स- श्रेयस सर्वेकर,प्रेयस सर्वे कर,शिर्षक गीत- सुशांत माळी, म्युझिक- रोहन झा, साउंड- चैतन्य नांदगावकर, पोस्टर- अजय माळी,आर्ट- वैभव माळी, लाइट्स - सूरज माळी, रंगभूषा- प्रदीप जाधव, व्यवस्थापन- साहिल जाधव, दिनेश जाधव यांनी केलेलं असून,संजित पेडणेकर, शुभम किजबिले, अतुल पवार, श्रेयस मोरे, श्रावणी आईनकर, साधना सुतार, अनोमा जाधव, श्वेता गणवे,आकांक्षा तांबडे, दिलीप मराठे, शांताराम पवार, अनंत कोबनाक, सतीश खैरे, सुभद्रा फुंदे, दिनेश सापटे,मंदार मुसळे, दीपांजली धाडवे, दिपाली काटकर मुख्य भूमिकेत आहेत. सदर वेबसिरीजचे प्रति आठवड्याला एक भाग असे जवळ जवळ ४०पेक्षा अधिक भाग रसिकांना पाहता येणार आहेत.

# ठाणे प्रिमियर लीगचा १ मे रोजी वाजणार बिगुल

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२८, ठाणे :** लेदर क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी टीपीएल नावाने प्रसिद्ध असणारी क्रिकेट स्पर्धा ठाण्यात रंगणार आहे. महाराष्ट्र माझा सेवा संस्थेतर्फे युनियन क्रिकेट क्लबच्या सहकार्याने, मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या संलग्नतेने १ ते ८ मे दरम्यान ठाणे प्रिमियर लीग २०२६ आयोजन दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे करण्यात आले आहे.

लीगचे यंदा १४ वे वर्ष असून आयपीएल आणि रणजी करंडक स्पर्धेतून खेळलेले क्रिकेटपटू लीगमध्ये खेळणार असल्याने ठाणेकरांना रंगतदार लढती पहायला मिळणार असल्याचे मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अॅपेक्स कौन्सिल मेंबर, महाराष्ट्र माझा सेवा संस्थेचे सल्लागार विकास रेपाळे यांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आठ दिवस रंगणाऱ्या या लीगमध्ये ठाणे जिल्ह्यातील १६ संघांचा सहभाग असणार आहे. या संघामधून आयपीएल खेळलेले अथर्व अंकोलेकर, अखिल हेरवाडकर, साईराज पाटील, हार्दिक तामोरे, ध्रुमिल मटकर, दिव्यांश सक्सेना, रॉयस्टन डायस, प्रग्नेश कानपिल्लेवार, प्रवीण तांबे हे क्रिकेटपटू खेळणार आहेत. स्पर्धे दरम्यान एकूण चार लाख रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार असून सर्वोत्तम फलंदाज, क्षेत्ररक्षक, गोलंदाज आणि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूस गौरवचिन्ह आणि रोख बक्षिस देण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने ठाणे, मुंबईतील आघाडीच्या क्रिकेटपटूंचा खेळ मोफत जवळून बघता येणार असल्याने ठाणेकर क्रिकेटप्रेमींनी स्पर्धेसाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवावी असे आवाहन विकास रेपाळे यांनी केले आहे.

**गरजू गुणवंत खेळाडूंचा सन्मान :** या स्पर्धे दरम्यान ठाणे जिल्ह्यातील गुणवंत पण गरजू असलेल्या खेळाडूंचा सन्मान करण्यात येणार असून क्रिकेट साहित्याचे त्यांना वाटप करण्यात येणारअसल्याचे विकास रेपाळे यांनी सांगितले.